# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-४३४-२०२४ दिनांक-१४/११/२०२४

## प्रेस नोट

**“ नयानगर पोलीस ठाणे गुरनं I ८५/२०१८, भा.दं.वि.सं कलम ३०७,४३६,४४०,३४२,३४ प्रमाणे दाखल गुन्हयातील ०२ आरोपींना मा.न्यायालयाने सुनावली १० वर्ष सश्रम कारावास व ३०००/रु दंडाची शिक्षा ”**

फिर्यादी कु. रुफी जुबेर इनामदार वय - २३ वर्षे यांचे वडील श्री. जुबेर इनामदार हे स्थानिक नगरसेवक असून ते नशामुक्ती संदर्भात नयानगर परीसरातील सोसायटयामध्ये मिटींग घेवून जनजागृती करत असतात. नयानगर येथील शम्स मस्जीदचे पाठीमागील रोडवर काही मुले दारु पिवून मोटार सायकल घेवून उभे राहत असल्याने त्याबाबत जुबेर इनामदार यांनी शम्स मस्जीदचे बाजुचे सोसायटीमध्ये पोलीसांसमवेत मिटींग घेतली होती. त्यामध्ये तेथील स्थानिक मुलेच दारु पिवून रोडवर अस्ताव्यस्त मोटार सायकली उभ्या करतात अशी तक्रार केली होती. त्या गोष्टीचा परिसरात राहणारे आरोपीत युनेब नासीर केवल व आसीफ अनवर खान यांनी मनात राग धरुन आपसात संगनमत करुन दि.०३.०२.२०१८ रोजी रात्रौ ०३.३० वा चे सुमारास फिर्यादी व तिची बहीण सिदरा, वय २५ वर्षे अशा दोघीजणी घरी झोपलेल्या असतांना फिर्यादी व तिचे कुटुंबियांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे बिल्डींगमध्ये येवून फिर्यादी व त्यांचे कुटुंबिय घरातून बाहेर पडू नये म्हणून आरोपी आसीफ खान याने फिर्यादीचे घराचे मुख्य दरवाजाची बाहेरील कडी लावून दरवाजावर प्लास्टीक बॉटलमध्ये आणलेले पेट्रोल टाकून आग लावून घर जाळून फिर्यादी व तिचे कुटुंबियांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून नयानगर पोलीस ठाणे गुरनं I ८५/२०१८ भादंविस कलम ३०७,४३६,४४०,३४२,३४ प्रमाणे गुन्हा दिनांक दि. ०३/०२/२०१८ रोजी १४.३३ वा.दाखल आहे.

सदर गुन्हयात आरोपीत १) युनेब नासीर केवल २) आसीफ अनवर खान यांना सदर गुन्हयात अटक करुन त्यांचे विरुध्द सबळ पुरावे गोळा करुन दि.०१.०५.२०१८ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते.

सदर गुन्हयाची मा. अति. जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे यांचे न्यायालयात सुनावणी सुरु होती. दिनांक १३.११.२०२४ रोजी केसची अंतिम सुनावणी होवुन मा.न्यायालयाने आरोपीत १) युनेब नासीर केवल २) आसीफ अनवर खान यांना १० वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ३०००/रु दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालिन पोलीस निरीक्षक श्री.बालाजी पांढरे (सध्या नेमणुक पोलीस आयुक्त,ठाणे शहर) यांनी केला असुन त्यांना सदर गुन्हयात सपोनि/सतिश निकम (सध्या नेमणुक वाचकमा.पोलीस आयुक्त मि.भा.व.वि.), सफौ/रमेश इगवे (सध्या सेवानिवृत्त), सफौ/महेश इंगळे (सध्या नेमणुक काशिमीरा पो.स्टे.), पोहवा/१३९२ मंजुर शेख (सध्या नेमणुक शहापुर पो.स्टे.) यांनी पुरावे गोळा करणे व कागदपत्र बनविण्यात मदत केली आहे. मा.न्यायाधीश श्री. जी.जी.भन्साळी ,मा.अति. जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे यांनी आरोपींना सदरची शिक्षा पाकिली असुन सदर केसमध्ये सरकारतर्फे मा.सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.डब्ल्यु.पांडे यांनी कामकाज पाहीले. सदर केसमध्ये मा.श्री.प्रकाश गायकवाड. पोलीस उप आयक्त.परि.०१.मिरारोड . मा.श्री.विवेक मगळीकर.

सहा.पोलीस आयुक्त, नवघर विभाग तसेच मा.वपोनि/विलास सुपे (सध्या नेमणुक मुंबई शहर), मा.वपोनि/ अमर जगदाळे नेमणुक नयानगर पो.स्टे यांचे मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी म्हणुन श्रे.पोउनि महादेव इंगवले, कोर्ट ऑडर्ली पोहवा/१२०२० प्रतिक सुर्यवंशी,पोअं/२३१०५ संदीप माने यांनी न्यायालयीन कामकाजात योग्य ती मदत केली असुन समन्स अंमलदार पोअं/२२०४२ शैलेश साबळे, पोअं/२३१०८ निरज घोडेकर यांनी वेळोवेळी मा.न्यायालयाकडुन प्राप्त समन्सची बजावणी करुन व साक्षीदार यांना वेळोवेळी साक्षकामी मा.न्यायालयात हजर ठेवुन महत्वाची भुमिका बजावली आहे.

**----0000----**